एल.ए.आर.नं. १७१/२००५
मुन्नालाल वि. चेअरमन
निशाणी क्र. ३५

अर्जदारातर्फे साक्षीदार क्र.१ कार्तीक मुन्नालाल कुशवाह -

<u>उलटतपास गैरअर्जदार क्र. १ आणि ४ तर्फे सुविद्य विधीज्ञ श्री. मोहरिल यांद्वारे -</u>

३. माझा सर्वे नं.५७/१ होता. माझे सर्वे नंबर हे सर्वे नं. ३३ ला लागुन आहेत. पुर्वी मी सोयाबिनचे, कापुसचे पिक घेत होतो. हे म्हणणे खरे नाही की माझ्या शेतीमध्ये विहिर नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्या शेतीला जलसिंचनाची सोय नाही. माझ्या शेतीला कॅनलने पाणी येत होते. त्यासाठी जलसिंचन विभागाला आम्ही पैसे देत होतो. या प्रकरणात त्याबाबतची पावती दाखल केलेली नाही.

४. माझ्या शेतामध्ये असलेल्या झाडाबददलची संयुक्त मोजणी झालेली नाही. मी माझ्या झाडांबददल वेगळा सर्वे केलेला नाही. संपादनाची प्रक्रिया ही भुसंपादन कार्यालया मार्फत झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की झाडांची किंमत मिळावी म्हणुन मी एम.एस.ई.बी.कडे अर्ज केलेला होता. हे म्हणणे खरे आहे की जमिनीची आणि झाडांची किंमत ही भुसंपादन अधिकारी यांनी ठरविलेली होती. हे म्हणणे खरे आहे की माझ्या अर्जामध्ये झाडांचे वय आणि त्यांचे उत्पन्न किती मिळत होते याचा उल्लेख नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की मला झाडांचे पैसे मिळाले नाही.

५. त्या ठिकाणी सध्या कच्चा रोड आहे. सदर रस्ता डुमरी रोड आहे. नांदगाव येथे जाण्यासाठी, डुमरी फाट्यावरुन, नागपूर जबलपूर हायवे वरुन जावे लागते. साक्षीदार स्वतः सांगतो की, दिड कि.मी अंतरावर आहे. हे म्हणणे खरे नाही की, अडिच कि. मी अंतर आहे. मी डुमरी स्टेशन येथे राहतो. मी नांदगाव येथील राहणा-या लोकांना ओळखतो. मी मोतीराम भोतमांगे यांना ओळखतो. हे मला माहित नाही की, भोतमांगे यांनी त्यांची जमीन सिमा उरकुडे, वर्षा उरकुडे यांना विकली होती. हे मला माहिती नाही की, त्यांची जमीन देखील संपादीत झाली आहे. त्यांनी, जास्त पैसे मिळावे म्हणून अर्ज केल्याचे मला माहित नाही. डुमरी फाटा हा नागपूर पासून ३० कि.मी अंतरावर आहे. हे म्हणने खरे आहे की, शेत जमीनी नंतर वनविभागाची जमीन सुरु होते. हे म्हणणे खरे नाही की, माझी जमीन ही कोरडवाहू होती आणि

सदर जमीनीची किंमत ८० हजार प्रती हेक्टर  पेशा जास्त नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या अर्जामध्ये आवास्तव , कोणत्याही आधारा शिवाय मागणी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की मला मिळालेला मोबदला हा बरोबर आहे आणि जास्त मोबदला मिळण्यास मी पात्र नाही. हे म्हणणे खरे नाही की जास्त पैसे मिळण्याच्या हेतुने खोटा अर्ज केला नाही.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
माझे समक्ष

SARODE SANDEEP MARUTI

L.A.R. No. 106-2005
Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2026.04.04 11:37:31 +0530

दिनांक ०२/०४/२०२६
रामटेक

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : R. J. Khobragade (Gr.-II)